।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

## Office of the Director Board of Examinations & Evaluation
Phone: (02462) 229294, 229520 website: srtmun.ac.in

जा.क्र.: संचालकपमुमं/उत्तरपुस्तीका/परिपत्रक/२०१७–१८/2055 दि. ०५/१०/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य तथा केंद्र प्रमुख
हिवाळी २०१७ सर्व परीक्षा केंद्र
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : हिवाळी २०१७ परीक्षांसाठी उत्तरपुस्तिकांच्या वापराबाबत व इतर सुचना.

संदर्भ : दि. ०८/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी २०१७ पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. ०६/१०/२०१७ पासुन तर पदव्युत्तर परीक्षा दि. १०/११/२०१७ पासुन सुरू होत असुन त्यासाठी आवश्यक असलेल्या २० पानी उत्तरपुस्तीका + OMR Sheet सह २० पानी उत्तरपुस्तीका, २४ पानी उत्तरपुसतीका, ३२ पानी उत्तरपुस्तीका अशा एकुण चारही प्रकारच्या उत्तरपुस्तीका पुरवठा करण्यात आलेल्या आहेत. या उत्तरपुस्तीका दि.०८/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मुल्यामापन मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार खालीलप्रमाणे वापर करावयात.

१. **२० पानी बारकोड (OMR Sheet सह) उत्तरपुस्तीकांचा वापर** : B.A., B.Com., B.Sc. व B.B.A. या अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्ष थेअरी आणि एम.सी.क्यू. पध्दतीच्या परीक्षांसाठी या उत्तरपुस्तीका वारण्यात याव्यात. ज्यामध्ये एम.सी.क्यू साठी OMR Sheet देण्यात येत आहेत. यासाठी परीक्षा केंद्र प्रमुखांनी एकच उपस्थिती अहवाल (फॉर्म नं. ०१) वापरावा व त्यावर थेअरी+एम.सी.क्यु असा उल्लेख करावा. तसेच विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार वरील अभ्यासक्रमाच्या MCQ प्रश्नांसाठी केवळ सुरूवातीचा अर्धा तास देण्यात आलेला असुन तो अर्धा तास संपल्यानंतर MCQ Sheet संबंधीत पर्यवेक्षकांनी त्या उत्तरपुस्तीकेतुन वेगळी करून घ्यावी व ती लगेच एका वेगळया पाकीटात तात्पुरते सिलबंद करावे व परीक्षा संपल्यानंतर केंद्रप्रमुखांनी उपस्थिती अहवालाची एक छायांकीत प्रत काढुन या MCQ Sheet उपस्थिती अहवालासह सिलबंद करून केंद्रीय मुल्यांकन केंद्र प्रस्तुत विद्यापीठात पाठविण्यासाठी तयार ठेवावेत.

२. **२० पानी बारकोड उत्तरपुस्तीकांचा वापर :** ज्या अभ्यासक्रमासाठी केवळ थेअरी पॅटर्न आहे व ४० गुणांची प्रश्नपत्रिका असेल त्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी २० पानाची (OMR Sheet) नसलेली Barcode ची उत्तरपुस्तीका वापरण्यात यावी.

३. **२४ पानी बारेकोड उत्तरपुस्तीकांचा वापर :** B.A., B.Com., B.Sc. व B.B.A. या अभ्यासक्रमाच्या थेअरी+एम.सी.क्यु. या पॅटर्नच्या तृतीय वर्षासाठी २४ पानी बारकोड उत्तरपुस्तीकांचा वापर करण्यात यावा.

४. **३२ पानी Barcode उत्तरपुस्तीकांचा वापर :** ज्या अभ्याक्रमाच्या प्रश्नपत्रिका ५० गुण व त्यापेक्षा अधिक असतील तर अशा पदवी/पदव्युततर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी ३२ पानी उत्तरपुस्तीकांचा वापर करण्यात यावा.

५. परीक्षार्थीना उत्तरपुस्तीका वितरीत करण्यापूर्वी त्यावर बारकोड, अनुक्रमांक असल्याची तसेच उत्तरपुस्तीकेतील सर्व पेजेस सुस्थीतीत असल्याची खात्री पर्यवेक्षकांनी करावी. उत्तरपुस्तीकेतील पेजेस कमी असल्याचे आढळून आल्यास ती उत्तरपुस्तीका वापरू नयेत.

६. कुठल्याही परिस्थीतीत परीक्षार्थीना पुरवणी देण्यात येवू नये तसेच पुरवणी देण्याबाबत विद्यापीठास संपर्क करू नये.

७. परीक्षा केंद्रास आवश्यक असणाऱ्या उत्तरपुस्तीका व इतर स्टेश्नरीची मागणी किमान तीन दिवस अगोदर उपकुलसचिव (परीक्षा विभाग) यांचेकडे करावी. यासाठी भ्रमनध्वनी क्रमांक ९९२३४०९४९१ वर संपर्क करावा.

८. परीक्षार्थीनी उत्तरपुस्तीकेवर त्यांना प्रवेशपत्रावर दिलेला बैठक क्रमांक अचुक लीहला असल्याची खात्री पर्यवेक्षकांनी करावी.

९. अपंग विद्यार्थ्यांना द्यावयाचा सुवीधा संदर्भात शासन निर्णय या पूर्वीच विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

सबब, वरीलप्रमाणे उत्तरपुस्तीकांचा वापर कटिकोरपणे होईल याची दक्षता संबंधीत केंद्र प्रमुखांनी घ्यावी व हि बाब परीक्षा केंद्रावरील सर्व पर्यवेक्षक व परीक्षेत कार्य करणाऱ्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी व परीक्षा सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.

आपला

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ